श्री दत्त प्रासादिक शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचालित

**स्व.राजकमलजी भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशीलाबाई भारती विज्ञान महाविद्यालय आर्णी,जि.यवतमाळ**

*नॅक द्वारे B श्रेणी प्रमाणित ( 2nd Cycle )*


# वाचन संकल्प महाराष्ट्राचा

## अहवाल

### दि.०१ ते १५ जानेवारी २०२५



**'वाचन संकल्प महाराष्ट्राचा'** या उपक्रमा अंतर्गत दि. **१ ते १५ जाने २०२५** या कालावधीत स्व.राजकमलजी भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशीलाबाई भारती विज्ञान महाविद्यालयात ग्रंथप्रदर्शन, सामुहिक वाचन, वाचन कौशल्य कार्यशाळा, लेखक वाचक परिसंवाद ,वक्तृत्व स्पर्धा, पुस्तक परीक्षण कथन, ग्रंथ समीक्षा लेखन स्पर्धा इत्यादी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाच्या नियोजनामध्ये ग्रंथालय विभाग, इंग्रजी व मराठी भाषा विभाग राष्ट्रीय सेवा योजना पथक तसेच सर्व विषयांच्या शिक्षक प्राध्यापकांचा समावेश करण्यात आला.


स्व.राजकमलजी भारती कला,वाणिज्य व श्रीमती सुशिलाबाई भारती विज्ञान महाविद्यालय, आर्णी

वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम अहवाल
आयोजित कार्यक्रम
दि.१ ते १५ जानेवारी २०२५

| | |
|---|---|
| ग्रंथ प्रदर्शन | ३० डिसें २४ ते ५ जाने २०२५ |
| सामूहिक वाचन | १ जानेवारी २०२५ |
| वाचन कौशल्य कार्यशाळा | १ जानेवारी २०२५ |
| लेखक वाचक परिसंवाद | ६ जानेवारी २०२५ |
| वक्तृत्व स्पर्धा | १२ जाने २०२५ |
| पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा | १६ जानेवारी २०२५ |
| बक्षीस वितरण | २६ जानेवारी २०२५ |

**ग्रंथप्रदर्शन :-** दि. ३० डिसेंबर ते ५ जानेवारी २०२५ पर्यंत निवडक पुस्तकांचे प्रदर्शन ग्रंथालयाच्या वाचन कक्षात आयोजित करण्यात आले. चरित्रे, आत्मचरित्र, कथा, लघुकथा, कादंबरी, रहस्यकथा, कविता संग्रह, गझल, प्रवासवर्णन, विज्ञानकथा, युद्धकथा, अनुवादित साहित्य, करिअर संदर्भातील पुस्तके अशा विविध प्रकारच्या पुस्तकांची मांडणी या ग्रंथप्रदर्शनात करण्यात आली. अनेक नामवंत लेखकांच्या आणि कवींच्या पुस्तकांचा यात समावेश करण्यात आला. विद्यार्थी वाचकांना विविध साहित्य प्रकारांचा परिचय करून देण्यात आला.

# ग्रंथ प्रदर्शन










**सामुहिक वाचन :-** ग्रंथ प्रदर्शनातील जास्तीत जास्त पुस्तके हाताळता यावी यासाठी ग्रंथालयात सामुहिक वाचन कक्षाची सोय उपलब्ध करून देण्यात आली. या दरम्यान विद्यार्थी व प्राध्यापकांच्या सामुहिक वाचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

## सामुहिक वाचन







**वाचन कौशल्य कार्यशाळा :-** दि. १ जानेवारी २०२५ रोजी वाचन कौशल्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.एम.एम.पांडे, मराठी विभाग प्रमुख प्रा.यु.डी.चव्हाण, ग्रंथालय विभाग प्रमुख डॉ.एस.व्ही.वानखडे यांचे प्रमुख उपस्थितीत वाचन कौशल्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत पुढील मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

1. विद्यार्थ्यांनी आपली आवड समजून घ्यावी व प्रथम आपल्याला आवडणाऱ्या विषयावरील पुस्तके वाचावी.
2. पुस्तक वाचतांना विषय – सार समजून घ्यावे.
3. विषय समजून घेतांना प्रस्तावना वाचावी.
4. पुस्तकाच्या मागील पानावर सारांश दिला असतो.
5. मोठ्या आकराच्या संदर्भ ग्रंथ मध्ये निर्देशांक असतात.
6. काही पुस्तकांमध्ये कठीण शब्दांचे अर्थ दिले असतात.
7. पुस्तकातील महत्वाच्या प्रसंगातून विषय कळतो.
8. पुस्तकांची आवड निर्माण झाल्यावर इतर विषयांची पुस्तके वाचावी.
9. विविध विषयांवरील पुस्तकांच्या वाचनामुळे शब्दांमधील खरा अर्थ कळतो.
10. अवांतर आणि विविध साहित्याच्या वाचनामुळे व्यक्तिमत्व विकास होतो.

# वाचन कौशल्य कार्यशाळा

**(WORKSHOP ON READING SKILLS)**

**१ जानेवारी २०२५**

*** आयोजक ***

**ग्रंथालय**

**एल.आर.भारती कला,वाणिज्य व एस.एस.आर. भारती विज्ञान महाविद्यालय**

**आर्णी, जि.यवतमाळ**

# वाचन कौशल्य कार्यशाळा






**लेखक वाचक परिसंवाद :-** या उपक्रमा अंतर्गत ग्रंथालय आणि इंग्रजी व  मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने "वाचक लेखक परिसंवाद "व 'लेखक आपल्या भेटीला 'या कार्यक्रमाचे दि. ६ जानेवारी २०२५  रोजी आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमा करिता प्रसिद्ध साहित्यिक डॉ. देवेंद्र पुनसे यांनी परिसंवादाच्या स्वरूपात विद्यार्थ्यांशी हितगुज साधले. डॉ. देवेंद्र पुनसे यांची सुमारे ११ पुस्तके प्रकाशित झाली असून त्यांची ‘या विश्वकथातून प्रेम बोलतेय, वाझोटीचा छावा, इथे जिंकला बाजार, The Burning Pyre ‘ ही पुस्तके विशेष लोकप्रिय झाली आहेत. वाचक लेखक परिसंवाद कार्यक्रमात   विद्यार्थ्यांनी, वाचकांनी  उत्स्फूर्ततेने आपल्या मनातील साहित्य निर्मिती बाबत असलेले अनेक प्रश्न विचारले असता, साहित्यिक म्हणून डॉ. देवेंद्र पुनसे यांनी  त्यांच्या खुमासदार शैलीत वाचकांच्या  शंकांचे निरसन केले व उत्कृष्ट साहित्य निर्मितीसाठी दर्जेदार ग्रंथवाचनाचे महत्व अगदी सोप्या शब्दात विशद केले.




या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून ग्रंथालय विभाग प्रमुख डॉ. शशिकांत वानखडे यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनाचे महत्व सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.

निवृत्ती पिस्तूलकर यांनी भूषविले. त्यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना दर्जेदार साहित्य निर्मितीसाठी पुढे येण्याचे आवाहन केले. याप्रसंगी परिमल या विद्यार्थी निर्मित  वार्षिकांकाचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतितेसाठी ग्रंथालय विभाग, इंग्रजी भाषा विभाग तसेच  मराठी भाषा  विभाग यांनी संयुक्तिक प्रयत्न केले.

**वक्तृत्व स्पर्धा :-** मोबाईल आणि सोशल मिडियामुळे तरुणांच्या वाचनावर विपरीत परिणाम होतो आहे हे लक्षात घेऊन त्यांना यासंदर्भात विचारप्रवृत्त करावे याकरिता दि.12 जाने 25 रोजी 'समाजमाध्यमे  आणि युवकांपुढील आव्हाने' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली. यास्पर्धेत मारियम मिर्झा, आयन शेख, समर्थ बोके,वैष्णवी कुऱ्हाडे, कावेरी राठोड,सलोनी कांबळे, गौरव वैद्य ,अक्षदा राठोड, मोहिनी केसार्वानी,बुशरा खान,नंदिनी चव्हाण, वैष्णवी शिंदे या विद्यार्थ्यांनी पुरस्कार प्राप्त केले. सांस्कृतिक विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाने या कार्यक्रमाचे आयोजन केले.



**पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा :-** विविध विषयांवरील नामवंत लेखकांची पुस्तके विद्यार्थ्यांच्या वाचनात यावी, त्यावर त्यांनी चिंतन व मनन करावे या दृष्टीने महाविद्यालयात ' पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा' कार्यक्रमाचे दि. 16 जाने 25 रोजी आयोजन करण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी शिवाजी सावंत, सुधा मूर्ती, डॉ. अब्दुल कलाम, अच्युत गोडबोले, माधव गडकरी, सदानंद देशमुख, मंगेश पाडगावकर, विंदा करंदीकर अशा अनेक नामवंत लेखक कवींच्या पुस्तकांवर भाष्य केले. ग्रंथालय, इंग्रजी विभाग आणि मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र वाचन संकल्प या कार्यक्रमांतर्गत ग्रंथसमिक्षण स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. शिल्पा संजय जाधव, द्वितीय क्रमांक अनुष्का अमोल देशमुख, तृतीय क्रमांक निकिता प्रमोद बोंद्रे या विद्यार्थिनींनी पटकावला. यास्पर्धेला विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.



# पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा











# पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा



















**ग्रंथसमिक्षा आणि ग्रंथ परीक्षण :-** विद्यार्थ्यांनी त्यांच्या आवडीच्या विषयांची पुस्तके वाचावी त्यांनी पुस्तकातील विषयाचे सार समजून त्यावर स्वत:च्या शब्दात परीक्षण लिहावे या उद्देशाने ग्रंथसमिक्षा आणि ग्रंथ परीक्षण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.'ग्रंथ प्रदर्शन आणि निवडक ग्रंथांच्या मुखपृष्ठांचे पोस्टर्स' या माध्यमातून ग्रंथप्रसार करण्यात आला. वरील सर्व स्पर्धांना विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.





# ग्रंथपरीक्षण व समिक्षा
















# ग्रंथपरीक्षण व समिक्षा

# NEWS



लोकमत

आर्णी येथील भारती महाविद्यालयात लेखक-वाचक परिसंवाद उत्साहात

Hello Yavatmal
Page No. 2 Jan 08, 2025
Powered by: erelego.com



पुण्य नगरी

भारती महाविद्यालयात लेखक–वाचक परिसंवाद

Yavatmal Edition
Jan 09, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com



देशोन्नती

## भारती महाविद्यालयात लेखक वाचक परिसंवाद

देशोन्नती वृत्तसंकलन

**आर्णी** : स्व. राजकमलजी भारती कला, वाणिज्य आणि सुशीलाबाई भारती विज्ञान महाविद्यालय, येथे वाचन संकल्प महाराष्ट्राचा 'या उपक्रमा अंतर्गत इंग्रजी, मराठी आणि ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'वाचक लेखक परिसंवाद 'व 'लेखक आपल्या भेटीला 'या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमकरिता प्रसिद्ध साहित्यिक व माजी प्राचार्य डॉ. देवेंद्र पुनसे यांनी परिसंवादाच्या स्वरूपात विद्यार्थ्यांशी हितगुज साधले. प्रास्ताविक डॉ. शशिकांत वानखडे यांनी केले. त्यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनाचे महत्व सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. निवृत्ती पिस्तूलकर होते. त्यांनी विद्यार्थ्यांना दर्जेदार साहित्य निर्मितीसाठी पुढे येण्याचे आवाहन केले. याप्रसंगी परिमल या वार्षिकांकचे प्रकाशन करण्यात आले डॉ. पुनसे यांचा परिचय इंग्रजी विभागाचे प्रा. मिलिंद पांडे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे संचालन प्रा. सुप्रिया ढाकुलकर हिने तसेच आभार प्रदर्शन प्रा. सदानंद बोळे यांनी केले. या कार्यक्रमाला प्रा. डॉ. विनीत माहुरे प्रा. कुसरे, उदयसिंग चव्हाण, प्रा. स्वाती मनवर, प्रा मनोज चव्हाण, प्रा. राजू पाटील कर्मचारीवृंद, आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. (ता.प्र.)

Yavatmal Edition
Jan 08, 2025 Page No. 7
Powered by: erelego.com



देशोन्नती

## भारती महाविद्यालयात ग्रंथ समिक्षा आणि परीक्षण

देशोन्नती वृत्तसंकलन

**आर्णी** : येथील स्व. राजकमलजी भारती कला वाणिज्य व श्रीमती सुशिलाबाई भारती विज्ञान महाविद्यालयात 'ग्रंथ समीक्षा आणि ग्रंथ परीक्षण' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी शिवाजी सावंत, सुधा मूर्ती, डॉ. अब्दुल कलाम, अच्युत गोडबोले, माधव गडकरी, सदानंद देशमुख, मंगेश पाडगावकर, विंदा करंदीकर अशा नामवंत लेखक कवींच्या पुस्तकांवर भाष्य केले. ग्रंथालय, इंग्रजी विभाग आणि मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र वाचन संकल्प या कार्यक्रमांतर्गत ग्रंथसमिक्षण स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत प्रथम शिल्पा जाधव, द्वितीय अनुष्का देशमुख, तृतीय क्रमांक निकिता बोंद्रे यांनी पटकावला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आयक्यूएसी संचालक प्रा. डॉ. प्रशांत आवते तर प्रमुख अतिथी ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा. डॉ. शशिकांत वानखडे, प्रा. मिलिंद पांडे, प्रा उदय चव्हाण होते. परीक्षण भारती महाविद्यालयात ग्रंथसमिक्षा आणि ग्रंथ परीक्षण कार्यक्रम फोटो आहेप्रा. विनीत माहुरे, प्रा. सदानंद बोळे यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा मनोज चव्हाण, प्रा स्वाती मनवर, प्रा. धीरज राठोड, प्रा. सचिन राठोड, प्रा. राजेंद्र पाटील यांनी केले. (ता.प्र.)

Yavatmal Edition
Jan 19, 2025 Page No. 7
Powered by: erelego.com



पुण्य नगरी

भारती महाविद्यालयात ग्रंथ समीक्षा कार्यक्रम

Yavatmal Edition
Jan 19, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com



अजिंक्य भारत

19 Jan 2025 - Page 16

ग्रंथसमिक्षा व ग्रंथ परीक्षण कार्यक्रम

नामवंत लेखकांची पुस्तके विद्यार्थ्यांनी वाचण्यासाठी उपक्रम

S.V.Wankhade
**Librarian**
L. Rajkamalji Bharti Arts, Commerce
& Smt. Sushilabai Bharti Science College
Arni Distt. Yavatmal





**Principal**
late R.Bharti Arts.Com.&
Smt.S.R.Bharti Sci.College
arni. Dist.Yavatmal

**दिनांक: २२/०१/२०२५**

**स्थळ: आर्णी जि. यवतमाळ**